## संक्षिप्त वृत्त



पंढरपूर : रक्तदान शिबिराप्रसंगी भारतीय स्टेट बँकेचे अधिकारी व कर्मचारी.

### भारतीय स्टेट बँकेच्या शिबिरात ५४ जणांचे रक्तदान

**पंढरपूर** : भारतीय स्टेट बँकेच्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त पंढरपूर शाखेच्यावतीने दि. २७ जून रोजी पंढरपूर येथे झालेल्या शिबिरात ५४ जणांनी रक्तदान केले. भारतीय स्टेट बँकेचे क्षेत्रीय प्रबंधक आनंद कुमार पाटकर, वंदना शिंदे, धनंजय होनमाने, आश्रय दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये पंढरपूर शाखेच्या कर्मचाऱ्यांनी रक्तदान करत सहभाग घेतला. तसेच भारतीय स्टेट बँकेच्या ग्राहकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या रक्तदान शिबिरास भारतीय स्टेट बँकेचे प्रबंधक राहुल गाडेकर, मुख्य प्रबंधक प्रसाद अलुरकर, प्रबंधक रोहित मेश्राम, प्रबंधक सिध्देश्वर शिंदे, उपप्रबंधक विनय पाठक, उपप्रबंधक संजय सिन्हा, सहाय्यक प्रबंधक एकनाथ वसेकर, सागर गायकवाड व कर्मचारी उपस्थित होते.



सोलापूर : अन्नदानप्रसंगी सिकंदर नदाफ, वाघमारे, विनोद गायकवाड आदी.

### एसएन एकता सामाजिक संस्थेच्यावतीने अन्नदान

**सोलापूर** : एस. एन. एकता बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने संस्थापक अध्यक्ष सिकंदर नदाफ यांच्या वाढदिवसानिमित्त बेघर, निवारा, गरजू लोकांसाठी अन्नदान करण्यात आले. यावेळी आपुलकी बेघर निवारा केंद्राचे प्रबंधक वाघमारे, सलीम फुलारी, विनोद गायकवाड, जयराम शेरला, अनिल विटकर, वलीअहमद शेख, सुफियान शेख, श्रीनिवास गड्डम, लालू शेरला, यासीन कोतकुंडे, शफी शेख, दस्तगीर बागलकोटे तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### डॉ. माधवी पोतदार 'डॉक्टरेट'ने सन्मानित

**सोलापूर** : वॉशिंग्टन डिजिटल युनिव्हर्सिटी अमेरिका या युनिव्हर्सिटीकडून सोलापूर येथील माधवी काशिनाथ पोतदार यांना सोशल वर्क डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले.



गोवा येथे सी ब्रिज सरोवर येथील समारंभात प्रमुख पाहुणे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते डॉ. माधवी पोतदार यांना डॉक्टरेट पदवी देण्यात आली. यावेळी डॉ. रानदिमा पॅथीरांगी वॉशिंग्टन, ग्लोबल रिप्रेझेंटिव्ह डॉ. राजेश सोनार, डॉ. बालाजी सिंग, डॉ. मुरारी काईमाल उपस्थित होते. डॉ. माधवी पोतदार यांचे अभिनंदन होत आहे.

### आंध्र भद्रावती माध्यमिक विद्यालयात पालक-शिक्षक सभा

**सोलापूर** : श्री आंध्र भद्रावती माध्यमिक विद्यालयात पालक-शिक्षक सभा पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता श्री सरस्वती मातेच्या पूजनाने झाली. प्रशालेतील सहशिक्षक भोसले यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या, अडचणी तसेच पालकांची जबाबदारी याबाबत आपले विचार व्यक्त केले. नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. मुख्याध्यापक मल्लिकार्जुन मोरडे (अध्यक्ष), श्रीनिवास गोसकी (उपाध्यक्ष), आरकेल (सचिवा), यशोदा बोगा (उपसचिवा), पालक सदस्य मनोहर फुलपाटी, शोभा यल्ला यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचलन आरकेल यांनी केले. आभार मानकर यांनी मानले.

### प्रवासादरम्यान दागिन्यांची चोरी

**सोलापूर** : सोलापूर ते सातारा जाणाऱ्या एसटी बसने पेनूरला जाण्यासाठी फिर्यादी रेश्मा राजमहंमद मुजावर (वय ४५, रा. पेनूर) हे प्रवास करीत असताना अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांच्या पर्समधील २ लाख १० हजार रुपये किंमतीचे ७ तोळे वजनाचे गंठण व नेकलेस चोरून नेल्याची घटना ५ जून रोजी सावळेश्वर टोल नाक्याजवळ घडली. या प्रकरणी रेश्मा मुजावर यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक क्षीरसागर हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने रिक्षा पळवली

**सोलापूर** : अज्ञात चोरट्याने रिक्षा चोरून नेल्याची घटना २६ ते २७ जून दरम्यान केशवनगर येथे घडली. या प्रकरणी सय्यद महमदसाब शेख (वय ४५, रा. सिद्धेश्वर नगर भाग ३, मजरेवाडी) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांची रिक्षा क्रमांक एमएच १३ सीटी ३४१६ ही गरुड महिबुब सुभाणी दर्गाहजवळ पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार पापडे हे करीत आहेत.

### सोलापूरकरांना मिळणार पर्यावरणपूरक रायडिंगचा अनुभव

**सोलापूर** : सोलापूरकरांना आता दर्जेदार आणि पर्यावरणपूरक रायडिंगचा अनुभव मिळणार असून भारतातील आघाडीच्या इलेक्ट्रिक दुचाकी वाहन उत्पादकांपैकी एक असलेल्या प्योर ईवीने नव्या शोरूमचे सोलापुरात उद्घाटन करण्यात आले आहे. या विस्ताराच्या माध्यमातून दक्षिण भारतात प्योर ईवी आपली उपस्थिती अधिक बळकट करत आहे. येथे प्योर ईवीचे संपूर्ण उत्पादन श्रेणी प्रदर्शित केली जाईल. यामध्ये ई प्लूटो ७जी मॅक्स आणि ईट्रिस्ट एक्स यासारख्या इलेक्ट्रिक दुचाकींचा समावेश आहे. सोलापुरातील हे शोरूम प्योर ईवीच्या देशव्यापी विस्तार धोरणाचा एक भाग आहे, ज्याचे उद्दिष्ट अधिकाधिक ग्राहकांपर्यंत इलेक्ट्रिक मोबिलिटी पोहोचवणे आहे.

# नऊ हजार विद्यार्थ्यांना सहा कोटी शिष्यवृत्तींचे वाटप

## शिक्षण विभागाची माहिती : आर्थिक मदतीमधून विद्यार्थी भागवतात आपली शैक्षणिक गरज

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील उच्चशिक्षण घेणाऱ्या ४३ संस्थेतील ९ हजार ८७४ विद्यार्थ्यांना ६ कोटी १२ लाख ९५ हजार ७६ रुपये शिष्यवृत्तींचे वाटप करण्यात आले आहे, अशी माहिती शिक्षण सहसंचालक विभागाच्यावतीने देण्यात आली आहे.

सोलापूर जिल्ह्यात कला, वाणिज्य, विज्ञान, तांत्रिक अशा ४१ संस्था आहेत व २ सामाजिक शिक्षण देणाऱ्या आहेत. यामध्ये विविध जाती, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासन शैक्षणिक मदत होण्यासाठी शिष्यवृत्ती देत असते. या मिळालेल्या आर्थिक मदतीमधून विद्यार्थ्यांना आपली शैक्षणिक गरज भागविण्यासाठी मदत होते.

सोलापूर जिल्ह्यातील उच्चशिक्षण देणाऱ्या ४३ संस्थांना २०२४ ते २५ मध्ये पदवीधर, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ६ कोटी १२ लाख ९५ हजार ७६ रुपये संबंधित संस्थेस अदा करण्यात आले आहेत. २ कोटी १४ लाख ६८ हजार ५६९ रुपये विद्यार्थ्यांना अदा करण्यात आले होते. २०२५ ते २०२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे आवाहन शिक्षण सहसंचालक उमेश काकडे यांनी माहिती दिली आहे.




### या आहेत योजना

गुणवंत विद्यार्थी (कनिष्ठ पातळी) ४४, गुणवंत विद्यार्थी-(वरिष्ठ पातळी) ५१, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (४३२), माजी सैनिकांच्या मुलांना शिक्षणात सवलत ६, एकलव्य शिष्यवृत्ती ११३, सरकारी संशोधन ४, शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती ३, राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना ११ हजार १३०, गणित/भौतिकशास्त्र गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती २, राज्य सरकारची ओपन मेरिट शिष्यवृत्ती ११८, राज्य अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती ४६.

### पडताळणीसाठी वेळ लागतो

विविध घटकातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताच परिपूर्ण अर्ज आपल्या संस्थेच्या माध्यमातून सादर करण्यात यावेत, पडताळणीसाठी वेळ लागतो. त्यांनतर परिपूर्ण अर्ज संबंधित विभागाला पाठवण्यात येतो.

**– उमेश काकडे, सहसंचालक, शिक्षण, सोलापूर**

## शिक्षकांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची फेर तपासणी करा

### प्रहार अपंग संघटना पुन्हा आक्रमक

**सोलापूर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक कर्मचारी खोट्या दिव्यांग वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे बदल्यांचा लाभ घेत असल्याचे निदर्शनास येत असल्यावरून संघटनेच्या वतीने याची तातडीने चौकशी करण्यासंदर्भात वारंवार सूचना करूनही तपासणी न झाल्याने पुन्हा प्रशासन सूचित करण्यात येत आहे, असा गंभीर आरोप अपंग क्रांती आंदोलन संघटनेने केला आहे. संघटनेच्या पुणे जिल्हाध्यक्ष सुरेश जाधव यांनी जिल्हा परिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अशा शिक्षकांची पुन्हा तपासणी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी संघटनेच्यावतीने करण्यात येत आहे.

संवर्ग एकमधून बदलीसाठी अर्ज करणारे किंवा विशेष सवलत घेणारे अनेक शिक्षक स्वत: किंवा त्यांच्या पत्नीच्या गंभीर आजाराचे प्रमाणपत्र सादर करून शासकीय सुविधा घेत आहेत. यामध्ये काही आजारग्रस्त शिक्षिक आठ-दहा वर्षांपासूनच पूर्णपणे बरे झाले आहेत तरीही अपंगत्वाचा लाभ घेत आहेत.

बोगस प्रमाणपत्रधारक शिक्षक व कर्मचारी हे चार चाकी सहजतेने चालवतात वाहन चालवताना रस्त्यावर दिसतात. यातील अनेक शासन रुग्णालयाकडून शारीरिक अपंगत्वाचा बोगस प्रमाणपत्राचा आधार घेतला आहे असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

शिक्षकांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची फेर तपासणी करा अन्यथा संघटनेच्या वतीने पुन्हा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

## मंगळवारी डॉक्टर्स अन् सीएंचा सन्मान

**सोलापूर/प्रतिनिधी**




फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, सोलापूर शाखा आणि दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय डॉक्टर्स डे आणि सीए डेच्या औचित्याने सोलापूर शहरातील आठ मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे.

हा सन्मान समारंभ मंगळवार, दि. १ जुलै रोजी सकाळी १० वाजता दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित कॉलेज ऑफ फार्मसी (शिवदारे कॉलेज, जुळे सोलापूर) येथे होईल.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर्स आणि चार्टर्ड अकाउंटंट यांचा सन्मान करण्यात येणार असून, यामध्ये स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्रतज्ज्ञ डॉ. मंजुश्री कुलकर्णी, मूत्रविकारतज्ज्ञ डॉ. ग्यानेंद्र शर्मा, हृदयविकारतज्ज्ञ डॉ. अनुपम शहा, मेंदूविकारतज्ज्ञ डॉ. दत्तप्रसन्न काटीकर, स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ज्ञ डॉ. प्रवीण खारे, बालरोगतज्ज्ञ डॉ. प्रतिभा पाटील आणि चार्टर्ड अकाउंटंट सीए एस. बी.पांढरे, किशोर आदोने यांचा सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात येणार आहे.

हा सन्मान सोलापूर जिल्हा न्यायालयाचे सरकारी वकील व सी. बी. आयचे कौन्सिल ॲड. प्रदीपसिंह रजपूत यांच्या हस्ते दिला जाणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डी. एस. टी. एस. मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे हे असतील, अशी माहिती पुरस्कार निवड समितीचे समन्वयक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी दिली.

कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान व डी. एस. टी. एस. मंडळाचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे यांनी केले आहे.

## आषाढी वारीसाठी इतर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांची सेवा

**सोलापूर** : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य, स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन आदींच्या नियोजनासाठी इतर जिल्ह्यातील पाच वरिष्ठ अधिकारी यांची सेवा सोलापूर जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा परिषद प्रशासनाकडून देण्यात आली. २७ जून ते ७ जुलै या दहा दिवसांच्या कालावधीसाठी कामकाज असणार आहे. धाराशिव जि. प.चे स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज राऊत, लातूर जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक प्रशांत काळे, धाराशिव जि. प. नरेगाचे जिल्हा समन्वयक आनंद मिरगणे, गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे आदींचा समावेश करण्यात आला आहे.

## वृत्तपत्र विक्रेते महेश कुलकर्णी यांचा मुलगा श्रेयश झाला वकील



वडील महेश कुलकर्णी यांच्यासमवेत श्रेयश.

**अकलूज/प्रतिनिधी**

अकलूज येथील वृत्तपत्र विक्रेते महेश कुलकर्णी यांच्या मुलाने वकिलीच्या परीक्षेत उज्ज्वल यश मिळवले. त्यामुळे आयष्यभराच्या मेहनतीला यश मिळाले असल्याची प्रतिक्रिया महेश कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

महेश कुलकर्णी यांचा जन्म सर्वसामान्य कुटुंबातील असल्यामुळे परिस्थितीशी सतत झगडत राहिले पण कधी हार मानली नाही. जिद्द चिकाटी आणि प्रामाणिकपणा व आई-वडिलांचे संस्कार याची शिदोरी बरोबर घेऊन वयाच्या १७ व्या वर्षांपासून

### वडिलांच्या कष्टाला मिळाले यश

आजतागायत सुमारे ३६ वर्षांपासून महेश कुलकर्णी यांनी अकलूज शहरात वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय करत आहेत. सुरुवातीच्या काळात तर सायकलीला पिशवी अडकवून घरोघरी वृत्तपत्रे पोहोचण्याचे काम केले तसेच चौकामध्ये बसून वृत्तपत्राच्या विक्रीचा व्यवसाय करत आले आहेत. वृत्तपत्र विक्रीतून मिळणाऱ्या तुटपुंज्या कमाईतून जिद्दीने त्यांनी आपल्या मुलीचे लग्न केले. मुलाने बीसीएसचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वडिलांकडे वकील होण्याची इच्छा व्यक्त केली. घरची परिस्थिती प्रतिकूल असतानाही महेश व त्यांच्या कुटुंबीयांनी अपार कष्ट करून मुलाला वकील केले आहे. त्यांच्या कष्टाला व जिद्दीला कौतुकाची थाप मिळत आहे. त्यांच्या पत्नी मनिषा कुलकर्णी यांनी अंगणवाडीत सेविका पदावर काम करून संसाराला हातभार लावला आहे. श्रेयश कुलकर्णी हे वकील झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## कर्मचारी वारीत गुंतल्याने जिल्हा परिषदेत शुकशुकाट

**सोलापूर/प्रतिनिधी**



सोलापूर : जिल्हा परिषदेत असा शुकशुकाट दिसत आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या मिनी मंत्रालयात गेल्या दहा ते बारा दिवसांपासून विविध विभागाचे कर्मचारी, अधिकारी पंढरपूर येथील आषाढी वारीच्या कामासाठी नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेत शुकशुकाट पसरला आहे.

आषाढी वारीच्या कामासाठी जिल्हा परिषद कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून वारीतील येणाऱ्या भक्तांची सेवा करत असतात. त्याचाच एक भाग म्हणून यंदाच्या वर्षीही जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यात्रेतील नियंत्रण कामासाठी मोठ्या प्रमाणात कामाला लागला आहे. ही सेवा जिल्हा परिषदेच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून देण्यात येते. जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात येणाऱ्या भाविकांसाठी सर्वतोपरी उपाययोजना उपलब्ध करून दिल्या जातात. येणाऱ्या भाविकांना यात्रा काळामध्ये कुठल्याही प्रकारच्या त्रास होऊ नये म्हणून जिल्हा परिषद प्रशासनाच्यावतीने योग्य ती खबरदारी घेतली जाते.

यंदाच्या वर्षीही अशाच प्रकारे तयारी करण्यात आली असून येणाऱ्या भाविक वारकऱ्यांना कुठलाही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. जिल्हा परिषदेतील कर्मचारी वारीत गुंतले असल्याने जिल्हा परिषदेत मात्र शुकशुकाट दिसत आहे.

# इंटरॅक्टिव्ह स्क्रीन टच पॅनलद्वारे शिकवला जातोय अभ्यासक्रम

## मनपा मुलांची मराठी केंद्रशाळा क्र. ४ मध्ये हायटेक शिक्षण; ई-लर्निंगमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी

**सोलापूर/प्रतिनिधी**

विजापूर नाका परिसरातील उत्कर्ष नगर येथील महापालिका मुलांची मराठी केंद्रशाळा क्र. ४ या शाळेमध्ये हायटेक पद्धतीचे शिक्षण देण्यात येत आहे. ई-लर्निंग यंत्रणा उपलब्ध करण्यात आली असून इंटरॅक्टिव्ह स्क्रीन टच पॅनलद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकवला जात आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. हायटेक शाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी आणि पालकांमध्ये एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला आहे.



सोलापूर : ई-लर्निंग सुविधांसमवेत शिक्षक व विद्यार्थी.

सोलापूर शहरात विजापूर रोडवरील उत्कर्ष नगर, गरीबी हटाव झोपडपट्टी क्र.२ येथे मनपा मराठी मुले केंद्रशाळा क्र.४ शाळा आहे. सन १९८२ पासून या शाळेमध्ये शिक्षणाचे धडे दिले जातात. महापालिकेच्या शाळांनी आता कात टाकली असून अमूलाग्र बदल झाले आहेत. महापालिका शाळाही हायटेक झाल्या आहेत. मनपा मुलांची मराठी केंद्रशाळा क्र. ४ मध्ये हायटेक शिक्षण दिले जात आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तथा उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त तथा मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी गिरीश पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेतील शाळांना जास्तीत जास्त शैक्षणिक सुविधा देण्याचा प्रयत्न आहे. या शाळेमध्ये इयत्ता बालवाडी ते सातवीपर्यंत २६० विद्यार्थी आहेत. एकूण आठ शिक्षक आहेत. मुख्याध्यापक संतोष जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात.

महानगरपालिका शाळा क्र. ४ या शाळेत महानगरपालिका क्षेत्रातील मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी महापालिकेकडून विशेष तरतूद योजनेंतर्गत मंजूर निधीमधून पाच इंटरॅक्टिव्ह पॅनल विथ टच स्क्रीन व ई-लर्निंग साहित्य उपलब्ध झाले आहे. इंटरॅक्टिव्ह स्क्रीन टच पॅनलमध्ये इयत्ता पहिली ते सातवीचा अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आला आहे. प्रोजेक्टरही उपलब्ध आहे. त्याचा अतिशय प्रभावीपणे प्रत्येक वर्गामधून शिक्षक वापर करत आहेत. त्याचा विद्यार्थ्यांचा अध्ययन अध्यापनामध्ये व शाळेच्या गुणवत्तेमध्ये वाढ होताना दिसून येत आहे.

विविध उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका उमा चंदनशिवे, विजय टेकाळे, राजश्री व्हनगुंडे, गीता ढाकणे, अमृता नांदवटे, रियाज नदाफ, विशाल मनाळे, रत्नमाला नवगिरे, मनीषा कांबळे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी वृंद परिश्रम घेतात.

### शाळेत विविध सोयीसुविधा उपलब्ध

या शाळेची चारही बाजूने सुंदर इमारत आहे. वृक्ष लागवड करण्यात आली आहे. ई लर्निंगसह शाळेची रंगरंगोटी, पिण्यासाठी शुद्ध पाणी, हँडवॉशची सोय यासारख्या सर्व सुविधा या शाळेत उपलब्ध आहेत. विविध योजनांचा लाभ येथील विद्यार्थ्यांना दिला जातो. विविध संस्था, संघटनांच्या माध्यमातून शाळेला मदत होते.

**– संतोष जाधवर, मुख्याध्यापक.**